**ठळक बातम्या**

- विद्यार्थी आंदोलनावर पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरुन विरोधी आणि सत्ताधारी पक्षाचे आरोप प्रत्यारोप, संसदेत आजही गदारोळ, कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब

- पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणादरम्यानच्या तक्रारींसाठी स्थापन न्यायाधिकरणांच्या निर्णयांचा तपशील सर्वोच्च न्यायालयाने मागवला

- होर्मुझच्या सामुद्रधुनीवर केवळ अमेरिकन नौदलाचं नियंत्रण असल्याचा डोनाल्ड ट्रंप यांचा दावा

**आणि**

- २३ वर्षांखालच्या राष्ट्रकुल तलवारबाजी स्पर्धेत पहिल्याच दिवशी १७ पदकं जिंकत भारताची दमदार सलामी

**<><><><><>**

नीट परीक्षेच्या प्रश्नावरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिस कारवाई आणि इतर मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे आजही संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात व्यत्यय येत राहिला. गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत, तर राज्यसभेचं कामकाज आधी दुपारी १२ आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

लोकसभेच्या कामकाजाला ११ वाजता सुरुवात झाल्यानंतर सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास घ्यायचा प्रयत्न केला, विद्यार्थी आंदोलनावरच्या पोलीस कारवाईबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांनी निवेदन करावं अशी मागणी विरोधकांनी केली. सभापती ओम बिरला यांनी सांगितलं, की गृहमंत्री अमित शहा निवेदन द्यायला

तयार असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी कालच दिली आहे. सभागृहाचं कामकाज चालू द्यावं, अशी विनंती सभासदांना केली.

***होल्ड... बाईट- ओम बिर्ला***

मात्र, गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

राज्यसभेत कामकाज सुरू झाल्यानंतर कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. विरोधकांच्या गदारोळातच अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी शून्य प्रहर पुरकारला. मात्र गदारोळ न थांबल्यानं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर अध्यक्षांनी प्रश्नोत्तराचा तास घ्यायचा प्रयत्न केला, पण विरोधकांनी घोषणाबाजी आणि गदारोळ सुरू केल्यामुळे त्यांनी कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

देशात आत्तापर्यंत १० कोटी ३३ लाखापेक्षा जास्त शेतकरी ओळखपत्रं तयार करण्यात आल्याची माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी लोकसभेत लेखी उत्तराद्वारे दिली. या ओळखपत्रांद्वारे प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी, प्रधानमंत्री पीकविमा योजनेसारख्या थेट लाभ वितरण योजनांसाठी नोंदणी करण्याची प्रक्रिया सोपी होते. शेतकरी आपला मोबाईल वापरून या ओळखपत्रासाठी नोंदणी करू शकतात, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

झारखंडमधे विद्यार्थी आंदोलनावर लाठीमार झाल्याच्या निषेधात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांनी आज संसद परिसरात निदर्शनं केली. विद्यार्थी आंदोलनाबाबत विरोधी पक्ष नेता राहुल गांधी चर्चेपासून पळ काढत असल्याचा आरोप निदर्शकांनी केला. सरकार चर्चेला तयार असून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देखील निवेदन देणार आहेत, मात्र विरोधी पक्ष गदारोळ करुन, कामकाजात व्यत्यय आणत असल्याचं रालोआ खासदारांनी सांगितलं.

झारखंडमध्ये विद्यार्थी आंदोलक नेते देवेंद्रनाथ महातो यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. काल रांचीमध्ये झालेल्या मोर्चाच्या वेळी जखमी झाल्यानंतर प्रकृती आणखी बिघडली. पोलिसांनी लाठीमार केल्याचा आरोप महातो यांनी केला आहे.  लाठीमाराच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीनं आज झारखंड बंद पुकारला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची साप्ताहिक बैठक मंगल मिलन आज नवी दिल्लीच्या संसदभवन परिसरात झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपा अध्यक्ष नितिन नवीन यांच्या सह भाजपा आणि मित्रपक्षांचे खासदार बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणादरम्यान वगळलेल्या मतदारांच्या अर्जांवर निर्णय घेण्यासाठी स्थापन केलेल्या न्यायाधिकरणांनी आत्तापर्यंत घेतलेल्या निर्णयांचे तपशील सादर करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं  आज निवडणूक आयोगाला दिले. या अर्जांवर निर्णय घेण्यासाठी या न्यायाधिकरणांना कालमर्यादा ठरवून देता येणार नाही, मात्र त्यावर देखरेख ठेवू, असं न्यायालयानं सांगितलं. मतदार याद्यांमधून वगळलेल्या मतदारांच्या अर्जांवर तातडीनं निर्णय व्हावेत, यासाठी काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. या न्यायाधिकरणांनी किती प्रकरणांवर निकाल दिला आहे आणि किती प्रकरणं प्रलंबित आहेत, याचा तपशील न्यायालयानं मागितला. या प्रकरणाची पुढची सुनावणी २५ ऑगस्ट रोजी होणार आहे.

**<><><><><>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीवर केवळ अमेरिकन नौदलाचा ताबा असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. वॉशिंग्टन डीसी मधे काल त्यांनी एका कार्यक्रमात दावा केला, की या युद्धात इराणची अवस्था अतिशय वाईट झाली असून तिथं महागाई दर ३०० टक्के वाढला आहे, इराणच्या सैनिकांचे पगार थकले आहेत, आणि सामुद्रधुनीत पेरलेले सुरुंग इराणने हटवले आहेत.

अमेरकिन नौदलाने सध्या होर्मुझमार्गे येजा करणाऱ्या जहाजांना इराणच्या बंदरांमधे जायला बंदी केली आहे.

**<><><><><>**

रशियानं काल रात्रीपासून युक्रेनच्या विविध भागांमध्ये केलेल्या हल्ल्यात किमान ९ जण ठार झाले, तर अनेकजण जखमी झाले. झापोरिझ्झिया इथं क्षेपणास्त्रं आणि हवाई बॉम्बहल्यात ६ जण मृत्यूमुखी पडल्याची, आणि १९ जण जखमी झाल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. इतर एका ठिकाणी ड्रोन आणि तोफांच्या हल्ल्यात ३ जणांचा मृत्यू झाला, तर ५ जखमी झाले. दुसरीकडे, रशियाच्या १५ प्रदेशांमध्ये युक्रेनचे जवळपास ४०० ड्रोन उद्‌ध्वस्त केल्याचा दावा रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं केला आहे.

**<><><><><>**

येत्या स्वातंत्र्यदिनापर्यंत चालणाऱ्या हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गात देशभर विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. देशभरात जागोजागी तिरंगी राष्ट्रध्वजाच्या प्रतिकृती हातात घेऊन पदयात्रा, सायकल यात्रा आणि बाईक रॅली काढण्यात येत आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, विधानसभा अध्यक्ष विजेंद्र गुप्ता आणि इतर आमदार आज विधानसभा परिसरात आयोजित तिरंगा यात्रेत सहभागी झाले.

सीमा सुरक्षा दलाने आज किशनगंज इथं सायकल यात्रा आयोजित केली आहे.

**<><><><><>**

हरवलेल्या व्यक्तींचं वय अथवा लिंग कोणतंही असलं तरी पोलिसांनी त्वरित एफआयआर दाखल करणे आवश्यक आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. न्यायालयाने याबद्दल पूर्वीच दिलेल्या निर्देशांचं ज्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात पालन झालेलं नाही त्यांच्या मुख्य सचिव आणि पोलीस मुख्ययुक्तांनी न्यायालयासमोर येऊन त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीसा का बजावु नयेत याबद्दलचं स्पष्टीकरण द्यावं असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ऐहसनुद्दीन अमानुल्ला आणि आर महादेवन यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

देशाच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय तसंच, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने भारताच्या जीआय अर्थात भौगोलिक संकेत उत्पादनांसंदर्भात एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. जीआय उत्पादनांच्या व्यापारीकरणाला जागतिक बाजारपेठेत गती देण्यासाठी हा करार करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत, जीआय समूह आणि अधिकृत वापरकर्त्यांना 'भारत जीआय'च्या नावाखाली 'ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स' आणि 'गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस' यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर सामील होण्यासाठी सुविधा दिली जाईल.

**<><><><><>**

नायजेरियात लागोस इथं सुरू असलेल्या २३ वर्षांखालील राष्ट्रकुल तलवारबाजी स्पर्धेत भारताने पहिल्याच दिवशी १७ पदकं जिंकत दमदार सुरुवात केली. यात, चार सुवर्ण, चार रौप्य आणि नऊ कास्य पदकांचा समावेश आहे. या खेळाच्या तीनही प्रकारात भारतीय खेळाडूंनी वर्चस्व गाजवलं.

**<><><><><>**

कॅनडा खुल्या टेनिस स्पर्धेत इगा श्वियांतेक हिनं डायाना श्नायडर हिच्यावर ६-२, ६-१ असा सहज विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. आता तिचा सामना

एलिना स्वितोलिनाशी होईल. स्वितोलिनानं उपांत्यपूर्व सामन्यात एकातेरीना अलेक्झांड्रोव्हा हिच्यावर ३-६, ६-०, ६-३ अशी मात केली.

**<><><><><>**

सातार्‍यात पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर आज मध्यरात्री झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला तर २ जण जखमी झाले. मध्यरात्री दीडच्या सुमाराला हा अपघात झाला. पुण्याहून सातार्‍याच्या दिशेन जात असलेल्या कारवरचं चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ही कार आधी दुभाजकाला धडकली आणि त्यानंतर पलीकडच्या लेनमध्ये जाऊन एका ट्रकवर आदळली. अपघातातल्या जखमींवर उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं ओडिशाला येत्या २ ते ३ दिवसासाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. ओडिशामध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच अंदमान निकोबार बेटे, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि राजस्थानमध्येही पुढच्या दोन दिवसांत वादळ, विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**